ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १७ | पुणें, बुधवार तारीख ४ जानेवारी, १९६१ | अंक १

## विविध माहिती

**लोकसभेंतील नवी सोय**—लोकसभेंत चालणाऱ्या कामकाजाची माहिती ताबडतोब हिंदीमधून व इंग्रजीमधून देण्याची सोय करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी दुभाषांचें साह्य घेण्यांत येणार आहे. लोकसभेंत निदान ७० सभासद तरी असे आहेत कीं त्यांना इंग्रजीचा गंधसुद्धां नाहीं. लोकसभेंत चालणारें काम सर्वांना समजण्याच्या दृष्टीनें हा उपक्रम सभापति करणार आहेत.

**सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत गुजरात राज्यांत ११ वर्षेपर्यंतच्या वयाच्या मुलांना सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण देण्याचा विचार करण्यांत येत आहे. शिक्षणाच्या ह्या योजनेसाठी गुजरात सरकारला ८ ते १० कोटी रुपये खर्च करावे लागतील. प्राथमिक शिक्षणाबाबत राज्यघटनेंत असलेलें हें उद्दिष्ट अद्याप कोणत्याच घटक राज्यानें गांठलेलें नाहीं.

**मुलांना दुपारचें जेवण फुकट**—ओरिसामधील चार समाज विकास योजनांतील शाळांत शिकणाऱ्या मुलांना दुपारचें जेवण फुकट देण्यांत येणार आहे. संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेच्या एका तज्ज्ञानें मुलांसाठी समतोल आहाराचे जिन्नस ठरविले आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ही योजना चालू ठेवण्यास ४ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**घटप्रभा येथें वीज-निर्मिति केंद्र**—निपाणीपासून २० मैलांवर असलेल्या घटप्रभा ह्या ठिकाणीं एक वीज निर्मिति केंद्र उभारण्याचें म्हैसूर राज्य सरकारनें ठरविलें आहे. ह्या केंद्रासाठी ३० लाख रुपये खर्च येणार आहे. तें पूर्ण झाल्यावर विजापूर जिल्ह्यांतील जमखिंडी, मुधोळ, रबकवी, बनहट्टी इत्यादि गांवांना विजेचा पुरवठा होऊं लागेल.

**चीनमधील अणुविज्ञान**—अमेरिकेंतील एका शास्त्रज्ञानें अमेरिकन शास्त्रज्ञांना असा इषारा दिला आहे कीं चीननें स्वतः बनविलेल्या अणुबाँबचा स्फोट केला अगर एखादा उपग्रह आकाशांत सोडला तर आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. चीनमध्यें निदान एक तरी अणुभट्टी असून चिनी शास्त्रज्ञ अणुविज्ञानाचा जोरानें अभ्यास करीत आहेत अशीहि माहिती त्यानें दिली.

**खाऊच्या पैशांतून बचत**—दिल्लीजवळील मेहेरोली गांवच्या एका शेतकऱ्याच्या मुलानें १५ रुपयांची नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् विकत घेतलीं. हा मुलगा दहा वर्षांचा असून नातलगांनीं दिलेल्या खाऊच्या पैशांतून गेलीं कांहीं वर्षे तो शिल्लक टाकीत असे. अशा रीतीनें जमलेल्या शिल्लकींतून त्यानें सर्टिफिकेटस् विकत घेतलीं.

**सहकारी शेती अयशस्वी**—हिंदमधील सहकारी शेतीचा कार्यक्रम आतांपर्यंत तरी अयशस्वी झाला आहे असें मत आचार्य विनोबा भावे ह्यांनीं व्यक्त केलें आहे. चीनमध्यें कम्युनिस्ट क्रांति झाल्यावर भूमिहीनांना जमीन वांटण्याचें काम प्रथम करण्यांत आलें. त्याचा उल्लेख करून आचार्य म्हणाले कीं, हेंच काम भूदान चळवळीला प्रेमानें करावयाचें आहे.

**गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मदत**—१९६२ सालीं होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा तयार होत आला आहे. ह्या जाहीरनाम्यांत गरीब व पण हुषार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेतां यावें म्हणून भरपूर रकमेच्या शिष्यवृत्त्या राज्यसरकारकडून देवविण्यांत येण्याचें आश्वासन असण्याचा संभव आहे. अशी योजना सध्यां मध्यप्रदेशांत चालू आहे.

**शाळेचें कॉलेजांत रूपांतर**—दिल्ली येथील आंध्र माध्यमिक शाळेचें रूपांतर आर्टस् व सायन्स कॉलेजांत करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी तिरुपती वेंकटेश्वर देवस्थानानें १५ लाख रुपयांची मदत देऊं केली आहे. विद्यापीठ अनुदान मंडळ १० लाख रुपये देईल. कॉलेज पुढील वर्षाच्या जूनपासून सुरू होईल.

**रशिआचा लष्करावरील खर्च**—१९६१ सालीं रशिआच्या लष्करावरील खर्चांत कपात करण्यांत येणार असल्याचें रशिआच्या अर्थमंत्र्यांनीं रशिआच्या पार्लमेंटमध्यें जाहीर केलें आहे. परंतु आकाशांतील प्रवासाविषयींच्या संशोधनावरील खर्च मात्र वाढविण्यांत येणार आहे. १९६१ पासून रशिआंत नवा रुबल व्यवहारांत येणार आहे. जुन्या १० रुबल्ला एक नवा रुबल, ह्या दरानें चलनाचा बदला देण्यांत येईल.

**विमानांच्या अपघातावर प्रकाश**—न्यूयॉर्क येथील विमानतळावर उतरणाऱ्या दोन मोठ्या प्रवासी विमानांची टक्कर होऊन १३४ लोक ठार झाले. ह्यांपैकी एका विमानांतील एका पेटींत विमानांचे कॅप्टन्स व तळावरील मार्गदर्शक अधिकारी ह्यांच्यांतील बोलणीं ध्वनिमुद्रित करण्याचें यंत्र होतें. ही पेटी आगीला अगर धक्क्याला दाद न देणारी आहे. पेटींतील ध्वनिमुद्रितावरून विमानाच्या अपघातावर प्रकाश पडण्याचा संभव आहे.

**आदिवासींना जमीन**—बडोदा जिल्ह्यांतील १३,००० एकर सरकारी मालकीच्या जमिनींचें वांटप आदिवासी शेतकऱ्यांत करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. त्यांपैकीं ५,००० एकर जमिनीचें वांटप नुकतेंच करण्यांत आलें. ही जमीन २,२५० आदिवासी शेतकरी कुटुंबांना वाटून देण्यांत आली. ह्या जमिनी त्यांच्याकडे खंडानें होत्याच.

**तरबेज नोकरवर्गाचें महत्त्व**—भारतामधील वाढत्या उद्योग-धंद्यांचा कारभार चालविण्यासाठी शिक्षण देऊन तरबेज केलेल्या नोकरवर्गाची अतिशय आवश्यकता आहे, असा विचार गोद्रेज कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. गोद्रेज ह्यांनीं व्यक्त केला आहे. अशा नोकरवर्गाच्या अभावीं नुसताच औद्योगिक विकास होत गेल्यास त्यापासून इष्ट तो फायदा मिळणार नाहीं, असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें.

**टीकच्या झाडांची लागवड**—बिहारमधील जंगल-वाढविण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत राज्यसरकारनें १०,००० एकर जमिनींत टीक झाडांची व १५,००० एकर जमिनींत बांबूंची लागवड करण्याचें ठरविलें आहे. बिहारमध्यें बांबूची लागवड चांगली होण्यासारखी असून त्यांचा उपयोग करून राज्यांत कागदाचे कारखाने काढतां येतील, असें जमिनीची पाहणी केल्यानंतर आढळून आलें आहे.

**कापडाच्या धंद्याचीं शंभर वर्षे**—अहमदाबादच्या गिरणी मालक संघानें भारतामधील कापडाच्या धंद्याची सांवत्सरी साजरी करण्याचें ठरविलें आहे. अहमदाबादमधील कापडाच्या धंद्याचा कसकसा विकास होत गेला हें दाखविणारें एक प्रदर्शन येत्या मार्चमध्यें सांवत्सरीच्या निमित्तानें अहमदाबाद येथें भरविण्यांत येणार आहे. साबरमती नदीच्या कांठीं ५०,००० चौरस वार जागा प्रदर्शनासाठी निवडण्यांत आली आहे.

**भारतीय लष्करासाठी रणगाडे**—भारतीय लष्करासाठी रणगाडे विकत घेण्याची शक्यता अजमावण्यासाठी लष्कराचे वरिष्ठ प्रतिनिधी सध्यां युरोपच्या दौऱ्यावर आहेत. भारताला स्वतःचे रणगाडे स्वतःच बनविण्याची इच्छा आहे. ह्या दृष्टीनें पश्चिम जर्मनींत तयार होणाऱ्या ३६ टन वजनाच्या रणगाड्यांची पाहणीहि प्रतिनिधी करतील. ब्रिटिश रणगाडेहि ते नजरेखालीं घालतील.

**धार्मिक पुस्तक घेण्यास नकार**—पंतप्रधान पं. नेहरू ह्यांना एका साधूनें एक धार्मिक पुस्तक देऊं केलें असतां त्यांनीं तें नाकारलें. आपण पुस्तकाची पूजा करतों असें साधूनें सांगतांच पुस्तकें पूजा करण्यासाठी नसतात, ज्ञानप्राप्तीसाठी असतात, असें पं. नेहरूंनीं साधूला सांगितलें. साधूच्या म्हणण्याप्रमाणें हें पुस्तक ६,००० वर्षांपूर्वी लिहिलेलें होतें. त्याचें नांव 'नागार्जुन' असें आहे.

**स्थानिक लोकांनाच नोकऱ्या द्या**—भारत सरकारचे कायदामंत्री श्री. ए. के. सेन बंगाल आर्थिक परिषदेंत भाषण करतांना म्हणाले कीं बंगालमधील सर्व कारखान्यांतून बंगालमध्येंच जन्मलेल्या व वाढलेल्या लोकांना नोकऱ्या देण्यांत याव्यात. अशा लोकांत ज्या लोकांनीं बंगाल आपला मानला असेल त्यांचाहि समावेश करण्यांत यावा. लोकांच्या आर्थिक जीवनांत स्थैर्य आणावयाचें असेल तर हाच एक उपाय आहे; असें करण्यांत कोती दृष्टि असण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

**अर्थशास्त्रज्ञांचा परिसंवाद**— गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स ह्या संस्थेतर्फे पुणें येथें अर्थशास्त्रज्ञांचा एक परिसंवाद भरविण्यांत येणार आहे. तो २१ ते २८ जानेवारीपर्यंत चालेल. आर्थिक विकासाचे मार्ग ' हा परिसंवादाचा विषय असून त्यांत ११ देशांतील २५ विख्यात अर्थशास्त्रज्ञ भाग घेणार आहेत. अपुरा विकास झालेल्या देशांच्या आर्थिक प्रश्नावर परिसंवादांत चर्चा होईल.

**मोहनिद्रेच्या विद्येचा उपयोग**—मोहनिद्रेचा उपयोग करून रोगावर उपचार करण्याची पद्धत वैद्यक शास्त्रांत महत्त्वाची ठरली आहे. परंतु त्यासाठी विद्येचा वापर करणाऱ्या रोग्याच्या जवळ असावा लागतो. ब्रिटनमधील एका प्रसिद्ध मोहविद्या-विशारदानें ह्या विद्येचा टेलिफोनवरूनहि उपयोग करतां येतो असें दाखवून दिलें आहे. कांहीं वेळां तर त्यांनीं दूर देशांतील माणसांवरहि आपल्या विद्येचा यशस्वी प्रयोग केला आहे.

**अणुशक्तीवरील विजेचा खर्च**—भारताच्या अणुशक्ती-मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा ह्यांनीं असा अंदाज केला आहे, कीं अणुशक्तीच्या साह्यानें एक किलोवॅट वीज उत्पन्न करण्यास सुमारें ३·४ नये पैसे खर्च येईल. तथापि, हिंदमध्यें सर्व ठिकाणीं कोळसा सांपडत नसल्यामुळें अणुशक्तीवरील विजेकडे खर्चाच्या दृष्टीनें पाहूं नये असें त्यांनीं सुचविलें आहे.

**चीनच्या आक्रमणाचा परिणाम**— चीननें भारतीय प्रदेशावर आक्रमण केल्यानें देशाच्या उत्तर सरहद्दीवर जी परिस्थिति निर्माण झाली आहे तीमुळें भारतामधील रेल्वेच्या विस्ताराचा कार्यक्रम अडून राहिला आहे, असे उद्गार मध्यवर्ती रेल्वे-मंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं काढले आहेत. तथापि प्रत्येक जिल्ह्याचें ठिकाण रेल्वे-मार्गावर आणण्याच्या दृष्टीनें रेल्वे बोर्ड पाहणी करीत असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

**सांची येथील स्तूपाची दुरुस्ती**—भोपाळपासून ४४ मैलांवर असलेल्या सुप्रसिद्ध स्तूपाची दुरुस्ती करण्याचें काम पुराण-वस्तु खात्यानें नुकतेंच पूर्ण केलें. हा बौद्धकालीन स्तूप २ हजार वर्षांचा असून तो मोडकळीस येत चालला होता. दुरुस्ती करण्यासाठी खात्याला २ लाख रुपये खर्च करावे लागले. दुरुस्ती करतांना ती नवीन पद्धतीनें करण्यांत आली.

**म्हैसूर राज्यांतील साखर कारखाना**—निपाणीपासून १४ मैलांवर संकेश्वर ह्या ठिकाणीं साखरेचा सहकारी कारखाना काढण्यांत येत आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १·५ कोटि रुपये भांडवल लागलें असून तो पुढील कांहीं महिन्यांत उत्पादनास प्रारंभ करील. कारखान्याच्या गुदामांच्या इमारतीचें काम पूर्ण झालें आहे. म्हैसूर सरकार साखरेच्या कारखान्यांना प्रोत्साहन देत आहे.

**सुरत येथें एंजिनिअरिंग कॉलेज**—गुजरात राज्यांत सुरत येथें एंजिनिअरिंगच्या अभ्यासक्रमाचें संपूर्ण कॉलेज उघडण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें असून त्याला राज्य सरकारनें मान्यता दिली आहे. कॉलेजमधील शिक्षणक्रमास १९६२ मध्यें प्रारंभ होईल. २५० विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय कॉलेजमध्यें करण्यांत येईल. कॉलेज स्थापन करण्यासाठी १ कोटी रुपये लागतील.

**शेंगदाण्याच्या तेलाची निर्यात**—भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई राजकोट येथें असें म्हणाले कीं शेंगदाण्याच्या तेलाच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा सरकारचा विचार नाहीं. सध्यां हिंदला परदेशीय चलनाची अतिशय गरज आहे. तेव्हां ज्या ज्या वस्तूंच्या निर्यातीनें परदेशीय चलन मिळेल त्या त्या वस्तूंची निर्यात करण्यास सरकार उत्तेजनच देईल.

**रशिआची सिलोनला मदत**—सीलोन सरकारच्या दशवार्षिक योजनेला मदत म्हणून रशिआनें १४ कोटी रुबल्सचें कर्ज देऊं केलें आहे. सीलोनच्या चलनांत त्याची किंमत १२ कोटि रुपये होईल. रशिआनें आपल्या चलनाच्या किंमतीची पुनर्घटना केल्यापासून रशिआपासून मिळणाऱ्या कर्जाचा उपयोग करून अधिक माल घेतां येणें शक्य होईल.

# अर्थ

बुधवार, ता. ४ जानेवारी, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रासायनिक औषधें वापरून पिकांचें नुकसान थांबवा

निपाणी भागांतील तंबाखूच्या पिकाचें पुष्कळसें नुकसान होत असल्यानें याविषयींचें आपलें म्हणणें मांडण्यासाठी केंद्र सरकारचे शेतकी आणि अन्नखात्याचे मंत्री श्री. स. का. पाटील ह्यांचे कानावर घालण्यासाठी एक शिष्टमंडळ त्यांना भेटलें आणि एक निवेदन त्यांनीं त्यास सादर केलें. निपाणी भागांत ऐंशी हजार एकर जमिनींत तंबाखूची लागवड होते आणि त्यांतून येणाऱ्या उत्पन्नांतून साडेतीन कोटि रुपये अबकारी कर या भागांतून सरकारला दिला जातो. देशाच्या उत्पन्नांत भर घालणाऱ्या या तंबाखू पिकावर रोग पडून जें नुकसान होतें त्याला तातडीनें प्रतिबंधक उपाय योजून या राष्ट्रीय नुकसानीला केंद्र सरकारनें त्वरित आळा घालावा, अशी मागणी या शिष्टमंडळानें शेतकी मंत्र्यांकडे केली. या मौल्यवान पिकाच्या संरक्षणासाठी शेतकऱ्यांना साहाय्य करणारी एक कायम स्वरुपाची योजना अंमलांत आणावी, अशीहि त्यांना सूचना केली. शेतीचें उत्पादन कसें वाढवितां येईल, हा आज भारतापुढील सर्वांत महत्त्वाच्या प्रश्न आहे. उत्पादनांत वाढ घडवून आणतांना, होणारें उत्पादन तण, कीड व रोग ह्यांमुळें नाश पावूं नये ह्याचीहि काळजी घेतली पाहिजे. पिकांवर रासायनिक औषधांचा उपयोग केला, तर फारच माफक खर्चांत खूपच जास्त पिकें हातांत पडूं शकतात, असा अनुभव आहे. "शेती व रासायनिक औषधें" ह्या पृ. ५ वरील लेखांत श्री. वा. कृ. कोगेकर, एल्. एजी. ह्यांनीं ह्याविषयीं दिलेली माहिती अतिशय उपयुक्त आहे; सरकारची संबंधित खातीं आणि जागरूक शेतकरी ह्यांनीं रासायनिक खतांच्या वापराचे बाबतींत पुढाकार घेणें आवश्यक आहे.

## भारतामधील लोखंडाच्या खनिजाची निर्यात

भारत व रुमेनिआ ह्या देशांत एक व्यापारी करार करण्यांत आला असून रुमेनिआनें भारताकडून लोखंडाची माती घेण्याचें कबूल केलें आहे. त्याच्याबदला रुमेनिआ भारताला पेट्रोलचे पदार्थ, तेलाच्या विहिरी खणण्याची यंत्रसामग्री व तिचे सुटे भाग पुरविणार आहे. खनिज तेल हा भारताच्या अर्थव्यवस्थेमधील एक कच्चा दुवा आहे. म्हणून तेलाच्या विहिरी खोदण्याची यंत्रसामग्री मिळविण्याचे प्रयत्न भारत सरकारकडून कसोशीनें करण्यांत येत आहेत. रुमेनिआकडून भारताच्या ईशान्य भागांत तेलाच्या शुद्धीकरणाचा एक कारखाना काढण्याच्या कामीं मदत होत आहे. परंतु त्याहींपेक्षा तेल-विहिरींच्या खोदाईची यंत्रसामग्री पुरविण्याची तयारी अधिक मोलाची आहे. कारण तेलाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याची गरज भारताला फार आहे. नुकत्याच झालेल्या कराराप्रमाणें १९६१ सालीं भारतानें रुमेनिआला २ लाख टन अशुद्ध लोखंडाचा पुरवठा करावयाचा आहे. १९६६ सालापर्यंत हा पुरवठा १० लाख टनांपर्यंत वाढविण्याचा मध्यवर्ती सरकारचा विचार आहे. पण, त्यासाठी सोयीस्कर बंदरांची आवश्यकता आहे. रुमेनिआ हा आतां भारताच्या अशुद्ध लोखंडाचें गिऱ्हाईक झालें आहे. रुमेनिआप्रमाणेंच जपान व झेकोस्लोव्हाकिआहि भारताचीं गिऱ्हाईकें ह्यापूर्वीच झालेलीं आहेत. त्याशिवाय पश्चिम जर्मनी, पोलंड व इटली ह्या देशांचीहि भारताकडून अशुद्ध लोखंड घेण्याची इच्छा आहे. पण ह्या मार्गांत एक अडचण आहे. युरोपांतील देशांना अशुद्ध लोखंडाची निर्यात मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी भारताच्या नैऋत्य किनाऱ्यावरील बंदरांचा विकास होणें अतिशय अगत्याचें आहे.

## मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यास भारतांत वाव

पश्चिम जर्मनीचे एक उद्योगपति हर पॅव्हेल पूर्वेकडील देशांचा दौरा करून जर्मनीला परतले आहेत. आपल्या दौऱ्यांत त्यांनीं भारतालाहि भेट दिली होती. आपल्या दौऱ्यासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, भारतांत मध्यम प्रतीचे उद्योगधंदे काढण्यास खूप वाव आहे. दुसऱ्या कोणत्याहि देशापेक्षा भारतच अशा उद्योगधंद्यांच्या स्थापनेस अधिक योग्य आहे. शिवाय भारतामधील ग्राहकांची बाजारपेठ एकसारखी वाढत जाणारी आहे. जर्मनी व भारत ह्यांच्यामधील धंदेवाल्यांनीं ह्या संधीचा फायदा घेतला पाहिजे. जर्मनीमधील कारखान्यांना दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणांत मजुरी यावी लागत आहे. भारत व जर्मनी ह्या देशांतील उद्योगपतींनीं सहकार्य केलें तर जर्मनीची निर्यात वाढविण्याच्या मोहिमेमधील एक व्यापारी तळ म्हणून भारताचा चांगला उपयोग होईल. ह्या संभाव्य तळाचा उपयोग करून आशिआंत व ज्या देशांत जर्मन माल अद्याप जात नाहीं त्या देशांत तो अधिक प्रमाणांत पाठविणें शक्य होईल. मध्यम आकाराचा उद्योगधंदा काढण्यास भारतांत १० लाख रुपयांपेक्षा अधिक भांडवल लागत नाहीं. अशा कारखान्यांना ५ वर्षांच्या काळांत गुंतविलेल्या भांडवलावर ३० ते ४० टक्के नफा होण्यासारखा आहे. त्यामधून खर्चाच्या बाबी वगळल्यावर किमान १० टक्के तरी नफा होईल. सध्यां जर्मनींत कामगारांची टंचाई आहे. तेव्हां ज्या ठिकाणीं कामगारांची विपुलता आहे त्या ठिकाणीं जर्मन भांडवल गुंतविण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यांत यावा हें साहजिकच होईल. जर्मनीचा अर्थमंत्री डॉ. एरहार्ड ह्यांना हर पॅव्हेल ह्यांचें मत मान्य असल्यानें जर्मन भांडवल अपुरा विकास झालेल्या देशांत गुंतविण्यास चालना मिळण्याचा संभव आहे.

**इंडिअन ऑइल कंपनी**— इंडिअन ऑइल कंपनी ह्या सार्वजनिक मालकीच्या कंपनीनें ३०,००० टन तेल साठविण्यासाठीं आपल्या मालकीच्या टाक्या बांधण्याच्या कामास प्रारंभ केला आहे. कंपनीच्या मुख्य टाक्या मुंबई, कांडला व कोचीन ह्या ठिकाणीं राहतील. त्याशिवाय, पुणें, रतलाम, अहमदाबाद, बडोदा, इंदोर व भोपाळ ह्या ठिकाणींहि तेल साठविण्याची सोय करण्यांत येत आहे.

## उत्पादन वाढवा; लोकसंख्येच्या वाढीला आळा घाला

मध्यवर्ती आंकडेवारीविषयक संघटनेनें नुकत्याच केलेल्या राष्ट्रीय नमुनापाहणींतील निष्कर्षावरून पाहतां, वाढत्या लोकसंख्येसाठी १९६५–६६ पर्यंत अन्नधान्यांचें उत्पादन वाढवून तें सुमारें १० कोटी टनांवर नेलें पाहिजे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंतच्या सरासरी उत्पादनाशीं तुलना करतां ही वाढ ३३–१/३ टक्क्यांहून जास्तच आहे.

लोकसंख्यावाढीमुळें लागणाऱ्या जादा अन्नाचा पुरवठा करण्यासाठी पूरक आणि संरक्षक अन्नपदार्थांचा खप वाढविण्याची जरूरी आहे. अन्नधान्यांपेक्षा या पदार्थांच्या उत्पादनाच्या बाबतींत परावलंबित्व त्यामानानें कमी असतें व उत्पादनांत नियमितपणाहि असतो. उपलब्ध माहितीप्रमाणें पाहतां, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत साखरेचें व गुळाचें उत्पादन ५० टक्क्यांनीं, वनस्पति तेलांचें १५·५ टक्क्यांनीं, दुधाचें ३३·३ टक्क्यांनीं वाढलें; तर लोकसंख्या ८·२ टक्क्यांनीं वाढून राष्ट्रीय उत्पन्न १८·४ टक्क्यांनीं वाढलें. गेल्या दहा वर्षांत इतकी वाढ होऊनहि समतोल आहाराच्या ठराविक गरजांच्या मानानें बहुतेक पूरक व संरक्षक अन्नपदार्थांचा वापर बराच कमी झाला. म्हणूनच लोकसंख्येच्या वाढीचें सध्यांचें प्रमाण बरेंच खाली आल्यावांचून आणि आपल्या आहारविषयक सवयी बदलल्यासेरीज, अन्नपदार्थांचें, विशेषतः संरक्षक आणि पूरक खाद्यपदार्थांचें उत्पादन वाढविणें आवश्यक होऊन बसलें आहे. पण नजिकच्या काळांत ही वाढ करतां येण्याची शक्यता दिसत नाहीं.

### तिसऱ्या योजनेंतील उद्दिष्ट

दररोज दर प्रौढामागें २०·९ औंस अन्नधान्याचा खप व्हावा इतक्या पातळीवर त्यांचें उत्पादन नेण्याचें उद्दिष्ट तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ठेवण्यांत येईल. लागवडीच्या क्षेत्रांत आणि दर एकरीं उत्पादनांत वाढ करून हें धान्योत्पादन प्रयत्नपूर्वक वाढविलें जात आहे. परदेशांतून आयात करूनहि अन्नधान्याचा पुरेसा सांठा केला जाईल.

### धान्योत्पादनाचा निर्देशांक

अन्नधान्यांच्या उत्पादनाच्या गेल्या दहा वर्षांतील निर्देशांकावरून उत्पादन वाढत असल्याचें दिसून येतें. १९४९–५० मधील १०० वरून हा निर्देशांक १९५५–५६ मध्यें वाढून ११५·३ आणि १९५८–५९ मध्यें १३०·१ वर गेला. याच कालावधींत लोकसंख्या ९·७ टक्क्यांनीं आणि दुसऱ्या योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत ती आणखी ६ टक्क्यांनीं वाढली.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत, लोकसंख्येंतील वाढ, खेड्यांतील लोकांची शहरांत होणारी गर्दी, राष्ट्रीय उत्पन्नांतील वाढीमुळें आणि विकास कार्यावरील विशेष खर्चामुळें वाढणारी क्रयशक्ति, यांमुळें अन्नधान्यांची मागणी बरीच वाढेल. यामुळें अन्नधान्याची परदेशांहून आणखी कांहीं वर्षे आयात करावी लागेल.

### सर्वांनीं हातभार लावलाच पाहिजे

या सर्व गोष्टींचा विचार केल्यास, केवळ धान्योत्पादनवाढीसाठी निर्धारपूर्वक व सर्वंकष प्रयत्न करून भागणार नाहीं तर लोकसंख्या वाढीच्या या विशेष प्रमाणासहि अटकाव करणें अगत्याचें आहे. हें उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कुटुंबनियोजनाची देशव्यापी मोहीम सतत चालविली पाहिजे. समाजसेवक, डॉक्टर, वैद्य, शास्त्रज्ञ, प्रशासक आणि राजकीय नेते या सर्वांनींच आपला देश अन्नधान्यांच्या बाबतींत स्वयंपूर्ण बनण्यासाठी हातभार लावला पाहिजे.

**महाराष्ट्राचा तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—भारत सरकारच्या नियोजन समितीनें महाराष्ट्र राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाकरितां ३९० कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. प्रथम समितीनें ३२० कोटी रुपयेच मंजूर केले होते. पण राज्य सरकारनें ह्यावरील नापसंति दर्शविल्यावर ३६० कोटी रुपये मंजूर करण्यांत आले. आतां मंजूर झालेली रक्कम मात्र अखेरची आहे.

**पाकिस्तानांत चहाची टंचाई**—भारताच्या चहाच्या बाजारांत पाकिस्तानला ५ लाख पौंड चहा विकत घेण्याची परवानगी मध्यवर्ती सरकारनें दिली आहे. गेल्या कांहीं महिन्यांत पाकिस्तानांत चहाची फारच टंचाई भासू लागली असून एक पौंड चहाला रु. ७ पर्यंत किंमत द्यावी लागत आहे. पाकिस्तान सरकारनें चहाच्या निर्यातीला चालू हंगामांत बंदी केली आहे.

**गाईच्या दुधाला मागणी नाहीं**—बृहद् मुंबईमधील दुधाच्या ग्राहकांना गाईचें दूध पुरविण्यांत येत नाहीं. कारण गाईच्या दुधाला पुरेशी मागणी नाहीं. भरपूर मागणी आल्यास सरकार गाईच्या दुधाच्या पुरवठ्याचा विचार करील, अशी माहिती महाराष्ट्र सरकारतर्फे देण्यांत आली. सध्यां आरे येथील गाईपासून मिळणारें तीन मण दूध म्हशींच्या दुधांत मिसळण्यांत येतें.

**कामटीनजिक कोळशाचा सांठा**—महाराष्ट्र राज्यांतील कामटी गांवाच्या आसपासच्या भागाची भूगर्भविषयक प्राथमिक पाहणी करण्यांत आली असतांना ह्या प्रदेशांत ३० कोटी टन कोळशाचा सांठा असल्याचें आढळून आलें. ह्यांपैकी निम्मा कोळसा पहिल्या प्रतीचा असावा असा अंदाज आहे. राज्यांतील खनिज संपत्तीचा शोध जारीनें करण्यांत येत आहे.

**आश्रमशाळांच्या मदतींत वाढ**—गुजरात राज्यांतील मागासलेल्या भागांत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळांना देण्यांत येणाऱ्या अनुदानांत वाढ करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. भिल्ल जमातींसारख्या आदिवासी लोकांसाठी त्या चालविल्या जातात. त्यांची संख्या ४० आहे. ह्या शाळांना त्यांच्या खर्चाच्या ८० टक्के अनुदान मिळत असे. आतां ही रक्कम ९० टक्के करण्यांत आली आहे.

**ताग मिळविण्याची खटपट**— चालू वर्षी पाकिस्तानांत तागाची टंचाई असल्यामुळें भारत सरकार इतर देशांकडून ताग मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. भारताला लागणारा ताग बहुतांशीं पाकिस्तानकडून मिळतो. आतां ब्रह्मदेश, सयाम, अर्जेंटिना व ब्राझिल ह्या देशांकडून ताग मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. ताग ही औद्योगिक कच्च्या मालापैकी एक महत्त्वाची वस्तू आहे.

**शास्त्रीय व तांत्रिक पुस्तकें**— ब्रिटनमधील ८ पुस्तकप्रकाशकांनीं मिळून इंग्रजी भाषेंतील २३ शास्त्रीय व तांत्रिक पुस्तकांच्या प्रती भारताला देण्याचें ठरविलें आहे. ह्या पुस्तकांची किंमत मुद्दाम कमी ठेवण्यांत आलेली असून ती छापण्याच्या कामीं ब्रिटिश सरकारनें आर्थिक साह्य केलेलें आहे. पुस्तकांच्या पुढील हप्त्यांत शब्दकोश, व्याकरण व पाठ्यपुस्तकें असतील.

**जगांतील गव्हाचें उत्पादन**—आंतरराष्ट्रीय गहूं-मंडळाच्या वार्षिक अहवालांत केलेल्या अंदाजाप्रमाणें १९६२ सालीं जगांतील गव्हाचें उत्पादन २२·१ कोटी टन, म्हणजे गेल्या वर्षीच्या पेक्षा ६० लाख टन गव्हाचें अधिक उत्पादन होईल. उत्तर अमेरिकेमधील गव्हाच्या पिकांत सर्वांत अधिक वाढ झालेली आहे. गव्हाच्या पिकाच्या अंदाजांत चीनमधील पिकाचा अंदाज धरलेला नाहीं.

## शेती व रासायनिक औषधें

( श्री. वा. कृ. कोगेकर, एल्. एजी. )

'शेतीमध्यें रासायनिक औषधांचें महत्त्व' या विषयावर ब्रिटनमधील रासायनिक द्रव्यें निर्माण करणाऱ्या तज्ज्ञांचा एक परिसंवाद शेल–केमिकल कं. लि. चे मि. एच्. जी. हक्ले यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या परिसंवादाचे वेळीं ब्रिटनमधील नॅशनल व टेक्निकल प्रेसचे प्रतिनिधी मोठ्या संख्येनें हजर होते. अध्यक्ष मि. हक्ले यांच्याशिवाय, परिसंवादास निरनिराळ्या रासायनिक द्रव्यांचें उत्पादन करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधीहि हजर होते. त्यामध्यें मुख्यतः मि. एच्. सी. मेलोर, प्लॅन्ट प्रोटेक्शन ( पिकांचें किडीपासून संरक्षण ) या असोसिएशनचे व्हाइस चेअरमन, मि. ए. डब्ल्यू. बिलिट, बूट्स प्युअरड्रग कं. चे प्रतिनिधी, डॉ. इ. होम्स ( प्लॅन्ट प्रोटेक्शन लि. ), मि. एन्. के. स्मिथ, मर्फी केमिकल कं. लि. चे प्रतिनिधि आणि डॉ. इ. एफ्. एडसन फिझॉन्स पेस्ट कंट्रोल लि. चे प्रतिनिधि वगैरे हजर होते.

परिसंवादास सुरुवात करतांना अध्यक्ष मि. हक्ले म्हणाले, कीं शेतीमध्यें उत्तम निरोगी व जास्त उत्पन्न देणारीं पिकें काढण्याकरितां उच्च प्रकारच्या शेतीची आवश्यकता असते हें जरी खरें असलें तरी पिकांचा किडी व रोग यांपासून बचाव करण्याकरितां रासायनिक औषधांच्या उपयोगाची जोड देणेंहि जरूरीचें आहे.

शेतीमध्यें दैनंदिन होणाऱ्या फरकाच्या परिस्थितींत शेतकऱ्यास रासायनिक औषधांचा उपयोग अत्यंत आवश्यकच आहे असें दिसून येतें. कारण, रासायनिक औषधांच्या उपयोगाशिवाय पिकें हातांत पडणें सध्यां फारच मुष्किलीची गोष्ट झालेली आहे हें आपण पाहतोंच.

### महत्त्वाचे तीन प्रश्न

रासायनिक द्रव्यांचा शेतीमध्यें उपयोग सुरू झाल्यापासून त्यांच्या उपयोगाचे बाबतींत कांहीं ठिकाणीं बराच विरोध दिसून येतो व या बाबतींत निरनिराळे प्रश्नहि विचारले जातात ते असे:– ( १ ) रासायनिक द्रव्यांच्या उपयोगाचा प्रसार करण्यापूर्वी त्यांचीं पूर्णपणें परीक्षणें केलीं जातात काय ? ( २ ) ज्या पिकावर रासायनिक औषधें शिंपडलीं जातात, तीं खाण्याचे कामीं अपायकारक होत नाहींत ना ? ( ३ ) रासायनिक औषधांच्या उपयोगामुळें वनस्पतींच्या एकंदर नैसर्गिक हालचालींवर कांहीं परिणाम होतात काय ?

पहिल्या प्रश्नाचे बाबतींत अध्यक्ष मि. हक्ले म्हणाले "नवीन रासायनिक द्रव्य उपयोगांत आणण्यापूर्वी त्यांजवर अतिशय खर्चाचे असे प्रयोग करून पाहण्यांत येतात. सर्वसाधारणपणें असें आढळून आलेलें आहे कीं सुमारें तीन हजार निरनिराळ्या रासायनिक द्रव्यांवर प्रयोग केल्यानंतर एखादेंच नवीन असें रसायन उपयुक्त ठरतें. निरनिराळ्या रसायनांची अत्यंत बारकाईनें तपासणी करण्याचें काम, प्रयोगशाळा, कांचगृहें व शेतांवर निरनिराळ्या परिस्थितींत केले जातात. याप्रमाणें रासायनिक औषधांचे दुष्परिणाम पिकावर होणार नाहींत याबद्दल अत्यंत खबरदारी घेतली जाते. थोडक्यांत म्हणजे, या प्रयोगावर जितका खर्च केला जातो व जितकी सावधगिरी घेतली जातें तितका खर्च व सावधगिरी दुसऱ्या कोणत्याहि धंद्यांत घेतली जात असेल असें वाटत नाहीं."

दुसऱ्या व तिसऱ्या प्रश्नासंबंधानें म्हणजे अनुक्रमें औषध शिंपडलेल्या पिकाच्यासंबंधीं व त्यांचा पिकावर होणारा परिणाम यासंबंधीं सांगतांना मि. हक्ले म्हणाले "औषध शिंपडलेल्या पिकांचा खाण्यास उपयोग करण्यापूर्वी तीं खाण्याच्या कामीं अपायकारक होणार नाहींत याबद्दलची मिनिस्टरी ऑफ ॲग्रिकल्चर या सरकारी संस्थेनें नियुक्त केलेल्या शास्त्रीय तज्ज्ञांकडून तपासणी करून घेतली जाते व त्यानंतरच ती उपयोगास योग्य आहेत असें ठरविलें जातें. वरील बाबतींत मिनिस्टरीशीं झालेली व्यवस्थाहि सर्व रासायनिक संस्थांच्या सूचनेवरूनच सरकारास केलेली असून ती सरकारनें मान्य केलेली आहे."

वरील प्रश्नोत्तरानंतर या विषयाच्या अनेक अंगोपांगांवर चर्चा झाली. युनायटेड किंग्डममध्यें किडीपासून दरसाल सुमारें चौदा ते सोळा कोटी पौंडांचें नुकसान होतें असा अंदाज काढण्यांत आला आहे.

शेतीमध्यें पिकावरील किडी व रोग यांवर रासायनिक औषधांचा उपयोग अत्यंत उपकारक ठरलेला आहे, असें आतां सर्वसाधारणपणें दिसून आलें आहे. यासंबंधीं कांहीं उदाहरणें खालीलप्रमाणें आहेत. पीज म्हणजे मटार यावर 'कॅटर पिलर' म्हणजे एक प्रकारचा सुरवंट पडतो त्यामुळें या पिकाचें पंधरा ते वीस टक्के नुकसान होतें, परंतु योग्य वेळीं त्यांवर औषध शिंपडले असतां या किडीपासून त्याचा बचाव होतो.

सन १८४५ सालीं आयर्लंड देशांत बटाट्यावर 'ब्लाइट' नांवाचा रोग पडला. हा रोग बटाट्याच्या पानावर पडतो त्यामुळें उत्पन्नांत पन्नास टक्के नुकसान झाल्यामुळें त्या वर्षी मोठा दुष्काळ पडला व लोक उपाशीपोटी मोठ्या प्रमाणावर दगावले; असें नमूद केलेलें आहे. हल्लीं या रोगावर उपाय सांपडलेला आहे.

सन १९३८ सालीं स्कॉटलंडमध्यें ओट ( एक तृणधान्य ) या पिकाचें बीं पेरण्यापूर्वी औषधांत घोळून पेरल्यानें या पिकाचें दहा टक्के नुकसान वांचलें. औषधाचा खर्च एकरीं सुमारें १ शिलिंग ६ पेन्स ( १ रु. २ आणे ) फक्त होता.

लढाईचे काळांत धान्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर करण्याकरितां चराऊ रानांचा उपयोग शेतीकडे करावा लागला. परंतु या जमिनींत पेरलेल्या गव्हावर कीटक व इतर रोग पडल्यामुळें पेरलेला गहूं उगवून आल्याबरोबर किडीकडून खाल्ला जाऊं लागला. अशा संकटाच्या वेळीं किडी व रोग या दोहींवर लागू पडणारीं औषधें उपयोगांत आणण्यांत आलीं. या औषधांवर झालेला खर्च मिळालेल्या उत्पन्नाच्या तुलनेच्या मानानें फारच अल्प होता.

धान्याच्या पिकांतील तणांचा नाश करण्याकरितांहि औषधें फवारलीं जातात. सध्यां ब्रिटनमध्यें प्रत्येक तीन एकरांस एक एकर या प्रमाणें हें फवारण्याचें काम चालतें या फवारण्यामुळें पिकांच्या उत्पन्नांत शेकडा चोवीस टक्के वाढ झालेली आहे.

बीट रूट ( ज्यापासून युरोपांत साखर तयार करतात तें पीक ) या पिकावर एक प्रकारचा व्हीरस रोग ( जंतुक ) पडतो. त्यामुळें या पिकापासून मिळणाऱ्या साखरेच्या उत्पन्नांत फार मोठ्या प्रमाणांत घट होते. हें नुकसानीचें प्रमाण दरएकरीं एक टन या प्रमाणें दरसाल चारलक्ष टन इतकें होतें. या रोगावर औषध शिंपडण्याचा खर्च एकरीं सुमारें १ पौंड, १० शिलिंग इतकाच येतो; परंतु फायदा मात्र एकरीं २० पौंड होतो.

परिसंवादाच्या समारोपाच्या भाषणांत अध्यक्ष मि. हक्ले म्हणाले, कीं लोकसंख्या सारखी वाढत आहे, या वाढत्या लोकसंख्येस पुरेल इतकें धान्यांचें उत्पादनहि आपण वाढविलें पाहिजे; नाहींपेक्षा मोठ्या प्रमाणावरील भूकबळींच्या संख्येस आपणांस तोंड द्यावें लागेल. नुसत्या शेतींत सुधारणा करून हा प्रश्न सुटणार नाहीं. शेती सुधारणेबरोबरच पिकावर रासायनिक औषधांचा उपयोग करणें हेंहि अत्यंत जरूरीचें आहे."

( "वर्ल्ड क्रॉप्स" वरून )

**तेलाच्या शोधासाठी मदत**—पाकिस्तानांतील भूमिगत तेलाचा शोध करण्याच्या कामीं पाकिस्तान रशियाची मदत घेणार आहे. ह्या कामासाठी पाकिस्तानचें एक प्रतिनिधि मंडळ मॉस्कोला गेलें आहे. कम्युनिस्ट राष्ट्रांशीं पाकिस्तान व्यापार करते. पण तांत्रिक व आर्थिक साह्य घेण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

**आसाममधील रस्त्यांची वाढ**— आसामचे मुख्य मंत्री श्री. चलिहा एका जाहीर सभेंत बोलतांना म्हणाले कीं ब्रिटिश राजवटीची सत्ता आसामवर १०० वर्षे होती. पण ह्या कालांत आसामच्या डोंगरी भागांत अवघे ३०० मैल लांबीचे रस्तेच मोटारींना वापरण्यासारखे होते. उलट, स्वातंत्र्यामधील गेल्या १२ वर्षांत अशा प्रकारचे १२,०० मैल लांबीचे रस्ते तयार झाले. आणखी ८०० मैलांचे रस्ते तयार होत आहेत.

**भारतामधील घड्याळांचे कारखाने**—हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्यांत बनविण्यांत आलेलीं घड्याळें १९६१ च्या ऑक्टोबरमध्यें बाजारांत विक्रीस येतील अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ह्याशिवाय दुसऱ्या एका खाजगी मालकीच्या कारखान्यांतहि घड्याळें तयार करण्यांत येणार आहेत. ह्या कारखान्यांत १९६२ मध्यें उत्पादनास प्रारंभ होईल.

**रशिआ विमानें पुरविणार**— पुढील वर्षाच्या प्रारंभीं रशिआकडून भारताला वाहतुकीचीं मोठीं विमानें पुरविण्यांत येणार आहेत. उत्तर सरहद्दीवर रस्ते बांधण्याची यंत्रसामग्री वाहून नेण्यास त्यांचा चांगला उपयोग होईल. प्रत्येक विमानाला ४ एंजिनें असून तें ३६,००० पौंड वजन नेऊं शकेल. विमानाची प्रत्येकी किंमत १ कोटी रुपये असेल अशी अपेक्षा आहे.

**पिण्याचे पाणी पुरविण्याच्या योजना**—गुजरात सरकारनें बानसकंठा जिल्ह्यांतील २५३ गांवांना पिण्याचें पाणी पुरविण्यासाठी योजना आखली आहे. ह्या योजनेसाठी एकूण १० लाख रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. ह्या रकमेपैकी ८·५ लाख रुपये ट्यूब वेल्स खोदण्यांत खर्च व्हावयाचे असून बाकीचे नेहमींच्या विहिरी खोदणावर खर्च करण्यांत येणार आहेत.

**पाणी-पुरवठ्याची योजना**—केरळ सरकारनें अर्णाकुलम्, कोचीन व आणखी दोन शहरें ह्यांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करणारी एक योजना आंखली आहे. पाणी शुद्ध करण्याची यंत्रसामग्री अलवाये येथें बसविण्यांत आली आहे. यंत्रसामग्रीची किंमत १६ लाख रुपये आहे. केरळमधील ग्रामीण भागांतहि उन्हाळ्यांत पाण्याची टंचाई जाणवते.

**रेल्वेच्या सामानाचें फिरतें प्रदर्शन**—भारतामधील रेल्वेला लागणाऱ्या वस्तूंचें एक फिरतें प्रदर्शन संघटित करण्यांत आलें आहे. हें प्रदर्शन तीन रेल्वे डब्यांत सामावलेलें असून त्यांत ४०० वस्तू आहेत. त्यांपैकी १० टक्के वस्तू परदेशांतून आयात करण्यांत आल्या असून, बाकीच्या देशांतच तयार करण्यांत आल्या आहेत. कारखानदारांना रेल्वेच्या गरजांची कल्पना यावी म्हणून हे डबे देशभर फिरविण्यांत येणार आहेत.

**हृदयविकाराची पाहणी**—भारतांत हृदयविकारानें होणाऱ्या मरणांचें प्रमाण वाढत आहे. त्यासंबंधीं कांहीं संशोधन करण्यांत येत आहे काय, असा प्रश्न लोकसभेंत विचारण्यांत आला होता. इंडिअन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च ह्या संस्थेतर्फे अशी पाहणी करण्यांत येत असल्याचें आरोग्यमंत्री श्री. डी. पी. करमरकर ह्यांनीं सांगितले. मानसिक ताण, धांवपळीचे जीवन व जागरण, ही कारणें त्यांनीं सांगितलीं.


# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

रावसाहेब य. द. खोले

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

• सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

# भारतांतील बँकांची सद्यःस्थिति

भारतांतील बँकांच्या सद्यःस्थितीची सुबोध माहिती येथें प्रश्नोत्तरांच्या स्वरूपांत दिली आहे. त्यामुळें नेहमी वाचनांत येणाऱ्या कित्येक शब्दप्रयोगांचा अर्थबोध होऊन बँकिंगची चालू परिस्थिति समजण्यास उपयोग होईल.

( निवेदक : "एक तज्ज्ञ बँकर" )

प्रश्न :—सध्यां ज्या २८७ बँकांना परवाना (लायसेन्स) नाहीं, त्यांपैकीं सुमारें ६० बँका लवकरच त्यासाठी पात्र होतील, अशी अपेक्षा अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांनीं नुकतीच व्यक्त केली. परवाना नसतांनाहि इतक्या बँका कशा चालू आहेत, तें कांहीं कळलें नाहीं.

उत्तर :—बँकिंग कंपन्यांच्या कायद्याप्रमाणें, प्रत्येक बँकेला बँकिंगचा धंदा चालविण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून परवाना मिळवावा लागतो. ज्या बँका भक्कम पायावर उभारलेल्या असून योग्य पद्धतीनें चालू आहेत, अशाच बँका काढाव्या, हा त्याचा उद्देश आहे. हा कायदा अमलांत आला त्या वेळीं ज्या बँका अस्तित्वांत होत्या, त्यांना रिझर्व्ह बँक परवाना नाकारीपर्यंत चालू राहायला हरकत नाहीं, अशी कायद्यांतच तरतूद आहे. लायसेन्स देण्यापूर्वी रिझर्व्ह बँक पूर्णपणें तपासणी करून संबंधित बँक ठेवीदारांचे सर्व पैसे परत करूं शकेल ह्याचा आणि तिचा व्यवहार ठेवीदारांच्या अनहिताचा नाहीं, याची खात्री करून घेते; बँकेला सुधारण्याला भरपूर संधि दिली जाते आणि सुधारणेच्या दिशाहि दाखविल्या जातात. एवढेंहि करून बँकेची सुधारणा झालीच नाहीं, तर मात्र परवाना नाकारला जातो.

प्रश्न :—ह्याचा अर्थ असाच ना, की आज परवाना नसलेल्या बँका सुधारण्याच्या मार्गावर आहेत ?

उत्तर :—असें साधारणतः म्हणायला हरकत नाहीं. इतक्या बँकांना अजून परवाना मिळालेला नसला, तरी ज्या ७७ बँकांना तो मिळाला आहे, त्यांच्याकडे बँकांकडील एकूण ठेवींपैकी ९५ टक्के ठेवी आहेत. परवाना नसलेल्या बँकांकडे फक्त ५ टक्के ठेवी आहेत, ही बँकिंगबद्दल मत बनवितांना लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे.

प्रश्न :—कोणत्या बँकेला परवाना आहे आणि कोणत्या बँकेला नाहीं, हें प्रकट केलें जातें का ?

उत्तर :—नाहीं, कारण त्यामुळें विनाकारण गैरसमज पसरायचा. एखाद्या लहान बिगर-शेड्यूल्ड बँकेला परवाना मिळालेला असायचा आणि एखाद्या मोठ्या शेड्यूल्ड बँकेलाहि तो मिळालेला नसायचा !

प्रश्न :—बँकांपैकी कांहीं शेड्यूल्ड आणि कांहीं बिगर-शेड्यूल्ड, असें म्हणतात. त्या दोन्हींत फरक काय ?

उत्तर :—रिझर्व्ह बँक कायद्याच्या दुसऱ्या शेड्यूलमध्यें ज्यांचा समावेश करण्यांत आलेला आहे, त्यांना शेड्यूल्ड बँका असें म्हटलें जातें. शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेकडून कांहीं विशेष सवलती मिळतात, तशाच त्यांच्यावर कांहीं जबाबदाऱ्याहि असतात. ज्या बँकेचें वसूल भांडवल आणि रिझर्व्हज् मिळून किमान ५ लक्ष रुपयांची रक्कम होते आणि शिवाय ज्या बँकांचा व्यवहार ठेवीदारांच्या अनहिताचा नाहीं, अशा बँकेलाच शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल करण्यांत येतें; ह्या अटी पार पडण्याचें थांबलें तर यादींतून तिचें नांव काढून टाकण्याचाहि रिझर्व्ह बँकेला अधिकार आहे.

प्रश्न :—अशा किती शेड्यूल्ड बँका आहेत ?

उत्तर :—१९५९ अखेरच्या आकड्याप्रमाणें त्या वर्षअखेर एकूण ३४२ हिंदी बँकांपैकीं ७८ बँका शेड्यूल्ड होत्या. त्याचप्रमाणें १६ विदेशी बँकांहि शेड्यूल्ड होत्या. २६४ बँका बिगर-शेड्यूल्ड होत्या.

प्रश्न :—बिगर-शेड्यूल्ड ह्याचा अर्थ, त्या बँकांचें वसूल भांडवल व रिझर्व्हज् ह्यांची बेरीज ५ लक्ष रुपयांपेक्षा कमी आहे, असाच ना ?

उत्तर :—होय; ज्या शेड्यूल्ड नाहींत त्या सर्व बिगर-शेड्यूल्ड. ह्या बँका बहुतेक लहान आकाराच्या असून त्यांचे व्यवहारहि फार पसरलेले नसतात. त्यांची संख्या मोठी असली, तरी त्या मानानें त्यांच्याकडे ठेवी कमी असतात. बँकेचा आकार लहान असला तरी त्यांची मजबुती कमी असते, असा मात्र निष्कर्ष काढतां येणार नाहीं.

प्रश्न :—त्यांच्या शाखांची संख्याहि शेड्यूल्ड बँकांच्या शाखांच्या मानानें कमी असणार ?

उत्तर :—तें स्वाभाविकच आहे; त्यांचें स्वरूपच प्रादेशिक असतें. १९५९ अखेरचे आंकडे पाहिले, तर ७८ हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या मिळून ३,८५९ कचेऱ्या होत्या; त्यांपैकी एकट्या स्टेट बँकेच्याच ८३३ कचेऱ्या होत्या. २६४ बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या मिळून ९२६ कचेऱ्या होत्या. विदेशी बँकांच्या कचेऱ्यांची संख्या ६६ होती.

प्रश्न :—कोणकोणत्या राज्यांत बँकांच्या कचेऱ्यांची संख्या मोठी आहे ?

उत्तर :—शेड्यूल्ड आणि बिगर-शेड्यूल्ड, दोन्ही प्रकारच्या बँकांचा आपण एकत्रितच विचार करूं या. सगळ्यांत जास्त बँक कचेऱ्या (८७६) मुंबई राज्यांत आहेत. त्याच्या खालोखाल मद्रास (७६४), केरळ (६२४), उत्तरप्रदेश (४४९), म्हैसूर (४४३), आंध्र (२९६), असा अनुक्रम लागतो. एकट्या दिल्लींत १५४ बँक कचेऱ्या आहेत.

प्रश्न :—आपल्या बँकांच्या भारताबाहेरहि कचेऱ्या आहेत ना ?

उत्तर :—आहेत तर ! १९५९ अखेर भारताबाहेर १०४ कचेऱ्या होत्या. त्यांपैकीं ५३ कचेऱ्या पाकिस्तानांत, १३ ब्रिटिश पूर्व आफ्रिकेंत, ११ मलायामध्यें, ७ ब्रह्मदेशांत, ५ युनायटेड किंगडममध्यें आणि ५ सिंगापूरमध्यें होत्या.

प्रश्न :—व्यवहाराच्या आकाराच्या दृष्टीनें शेड्यूल्ड बँका महत्त्वाच्या आहेत; त्यांचे कांहीं आंकडे सांगतां येतील का ?

उत्तर :—रिझर्व्ह बँक दर आठवड्याला त्याविषयीं पत्रक प्रसिद्ध करतें. २ डिसेंबरचे भारतांतील व्यवहाराचे आंकडे असे आहेत:—त्यांच्याकडे बँका वगळून इतरांचे कडूनच्या ६८० कोटी रुपयांच्या 'डिमांड' ठेवी होत्या आणि १०८३ कोटि रुपयांच्या 'टाइम' ठेवी होत्या. त्यांनीं ६८६ कोटि रुपये सरकारी रोख्यांत गुंतवून ९५६ कोटि रु. चीं कर्जे, कॅश क्रेडिट्स् व ओव्हर ड्राफ्टस् दिलीं होतीं. त्यांत इतर स्वरूपांतलीं कर्जे मिळविलीं, तर ती बेरीज ११५१ कोटि रुपये होते.

प्रश्न :—रिझर्व्ह बँकेचे हिंदी बँकांवरचे अधिकार खूप वाढले आहेत ना ?

उत्तर :—होय; बँकांच्या तपासणीचा अधिकार त्यांत फार महत्त्वाचा आहे. कारभारांतील दोष त्यामुळें बँकांना ताबडतोब कळूं शकतात व ते दुरुस्त होऊं शकतात. तपासणीच्या अधिकाराच्या अनुषंगानें इतराहि अधिकार आलेच. त्या सर्वांचा चांगला परिणाम झाला आहे; होत आहे. ठेवीदारांचें हित जतन करणें, हा उद्देश त्या सर्वांच्या मुळाशीं आहे.

प्रश्न :—हल्लीं "मोरेटोरियम" हा शब्द बराच ऐकूं यायला लागला आहे. त्याचा अर्थ काय ?

उत्तर—बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत नुकतीच सुधारणा करण्यांत आली असून त्या कायद्यांत ४५ वें नवें कलम घालण्यांत आलें आहे. एखादी बँक अडचणींत असली, तर तिच्या परिस्थितीची छाननी करून वाटाघाटी करायला साहजिकच थोडा वेळ लागणार. ह्या मुदतींत बँकेची स्थिति आणखी खालावूं नये, घोटाळे होऊं नयेत, ह्यासाठी तिला तात्पुरता 'मोरेटोरियम' जाहीर करणें हिताचें ठरतें. रिझर्व्ह बँकेच्या अर्जावरून मध्यवर्ती सरकारला अशी कमाल सहा महिने मुदतीची तहकुबी देतां येते. ह्या मोरेटोरियमच्या मुदतींत रिझर्व्ह बँकेला बँकेच्या पुनर्घटनेची, दुसऱ्या बँकेंत विलीन करण्याची योजना करायला अवधि मिळतो. सरकारनें ती योजना मंजूर केली, म्हणजे ती संबंधित बँकांवर बंधनकारक होते. त्याचे भागीदार व ठेवीदार ह्यांनाहि तक्रार करतां येत नाहीं. गेल्या कांहीं महिन्यांत कांहीं बँकांच्या बाबतींत मोरेटोरियम जाहीर झाला आहे.

प्रश्न—मोरेटोरियम म्हणजे सक्तीच्या विलीनीकरणाची पूर्वतयारीच म्हणायची ?

उत्तर—होय, बहुंशीं हें खरें आहे. सक्तीच्या अभावीं अतिशय दिरंगाई होते आणि ठेवीदारांचें नुकसान होते, असा अनुभव आल्यावरून कायद्यांत ही दुरुस्ती करण्यांत आली. आतां संबंधित बँकांच्या संचालकांची आडकाठी येण्याचा प्रश्नच उरला नाहीं. रिझर्व्ह बँक सांगेल, ती योजना. मात्र, त्याला मध्यवर्ती सरकारची मंजुरी लागेल; ती अर्थात् मिळेलच.

—'केसरी'

### दरमाणशीं उत्पन्नांत घट

भारतांतील दरमाणशीं उत्पन्न १९५८–५९ मध्यें २९३·६ रु. होतें, तें १९५९–६० मध्यें २९१·२ रु. वर उतरलें. राष्ट्रीय उत्पन्न ५% वाढूनहि त्यापेक्षासुद्धां लोकसंख्या अधिक प्रमाणांत वाढल्यामुळें दरमाणशीं उत्पन्न घटलें.

**राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाचें उद्घाटन**— उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं दिल्ली येथें राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाचें उद्घाटन केलें. संग्रहालयाच्या इमारतीच्या पहिल्या अवस्थेसाठी ५५ लाख रुपये खर्च झाले आहेत. भारतामधील ख्रिस्तपूर्व २,५०० वर्षांच्या जुन्या संस्कृतीच्या अवशेषापासून १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धापर्यंतच्या कालाच्या अनेक वस्तू संग्रहालयांत ठेवण्यांत आल्या आहेत.

**मदुरा शहरासाठी दुधाचा पुरवठा**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत मदुरा शहराला दुधाचा पुरवठा करण्यासाठी एक केंद्र उभारण्यांत येणार आहे. दूध निर्जंतुक करण्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीसाठी संयुक्त-राष्ट्र संघाकडून आर्थिक साह्य मिळणार आहे. दूध पुरवठा केंद्रासाठी ११५ एकरांची जागा निवडण्यांत आली आहे. यंत्रसामग्रीसाठी ४० लाख रुपये खर्च करावे लागतील.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००.००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन ( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव कालुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस :
४५५ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर

स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :
पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९५९ |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,८८,५२,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,१७,२५,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.